**नियमित फौजदारी खटला क्र.५०/२०२३**
**सरकार वि. गोविंदा उष्टू कुंभरे**
**निशाणी क्र. ९**

**<u>दोषारोप</u>**

मी समीर दि. कमलाकर, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पोंभुर्णा

गोविंदा उष्टू कुंभरे,
वय – ४५ वर्ष, धंदा – मजूरी,
रा. बोर्डा दिक्षीत, ता. पोंभूर्णा, जि.चंद्रपूर.

याच्यावर खालीलप्रमाणे आरोप निश्चित करत आहे.

तुम्ही दिनांक ०५/०६/२०२३ रोजी सायंकाळी १९.०० ते १९.३० वाजेच्या सुमारास मौजा नविन गंगापूर येथील येथील कोंडवाड्याजवळ रस्त्यावर तुमच्या ताब्यातील मोटार सायकल नोंदणी क्र. एम.एच.३४–झेड–१५४ ही सार्वजनिक रस्त्यावर भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने चालविली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाचे कलम **२७९** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील उपरोक्त वाहन सार्वजनिक रस्त्यावर भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने चालवून अपघात केलात. त्यामुळे तुमच्या गाडीच्या मागे बसलेला कालीदास देवाजी पेंदोर याला गंभीर दुखापती पोहोचविल्या व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाचे कलम **३३८** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील उपरोक्त वाहन सार्वजनिक रस्त्यावर भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने चालवून अपघात केलात व त्यामुळे मोटार सायकलवर मागे बसलेला कालीदास देवाजी पेंदोर याच्या मृत्युस कारणीभूत ठरलात जो सदोष मनुष्यवध नाही व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाचे कलम **३०४–अ** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील उपरोक्त वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने तसेच वाहतुकीच्या नियमांकडे व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन सार्वजनिक जिवीत धोक्यात येईल तसेच इतरांना भय उत्पन्न होईल अशा रितीने चालविले व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायद्याचे कलम **१८४** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील उपरोक्त वाहन मद्याच्या अंमलाखाली ज्याने तुम्हाला सदर वाहनावर नियंत्रण ठेवता येणार नाही अशा रितीने चालविले व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायद्याच्या कलम **१८५** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील उपरोक्त वाहन तुमच्याकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना नसताना सार्वजनिक रस्त्यावर चालविले व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायद्याचे कलम **३** चा भंग करुन कलम **१८१** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी वेळी व ठिकाणी तुम्ही उपरोक्त मोटार सायकल या वाहनाचा वैध विमा नसताना सार्वजनिक रस्त्यावर चालविली व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायद्याच्या कलम **१४६** चा भंग करुन कलम **१९६** अन्वये गुन्हा केला आहे.

आणि मी याद्वारे तुमच्याविरुध्द वरील गुन्हयाकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

SAMEER DILIP KAMALAKAR
Digitally signed by SAMEER DILIP KAMALAKAR
Date: 2024.06.26 14:04:54 +0530

(स. दि. कमलाकर)

दिनांक २६.०६.२०२४ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पोंभुर्णा.

## <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीला उपरोक्त दोषारोप मराठी भाषेत वाचून व समजावून सांगितला.

SAMEER DILIP KAMALAKAR
Digitally signed by SAMEER DILIP KAMALAKAR
Date: 2024.06.26 14:05:00 +0530

(स. दि. कमलाकर)

दिनांक २६.०६.२०२४ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पोंभुर्णा.